दिनांक - 20 /07/2023 रोजीचा प्रशासकीय ठराव क्र.52

विषय – विटा नगरपरिषद घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत कच-यावर प्रक्रिया करणे व त्याची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट करणे, घनकच-यापासून Manual कंपोस्ट तयार करणे, घनकच-याचे शास्त्रोक्त पध्दतीने भूभरण करणे कामास मुदतवाढ देणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ – मा.मुख्याधिकारी यांनी आरोग्य निरिक्षक यांची दि.19/07/2023 रोजी मंजुर केलेली टिपणी.

घनकचरा व्यवस्थापन भूमी येथे घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत कच-यावर प्रक्रिया करणे व त्याची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट करणे, घनकच-यापासून Manual कंपोस्ट तयार करणे, घनकच-याचे शास्त्रोक्त पध्दतीने भूभरण करणेची निविदा स्थायी समिती ठराव नं. 65 दि.29/04/2022 ने भैरवनाथ एन्व्हायरमेंट सोल्यूशन प्रा.लि , विटा यांची मंजूर करणेत आली आहे. या संस्थेमार्फत निविदेनुसार काम करीत आहे. सदर निविदेची मुदत दि. दि.04/05/2023 रोजी समाप्त झाली होती. सदर कामास मुदतवाढ मिळणेकामी मक्तेदार भैरवनाथ एन्व्हायरमेंट सोल्यूशन प्रा.लि , विटा यांनी अर्जाने कळविले होते. त्यानुसार नगरपरिषद प्रशासकीय ठराव नं.9 दि.27/04/2023 ने दि.10/06/2023 पर्यंत मुदतवाढ देणेत आली होती.

सध्या सदर कामाच्या तांत्रिक मंजुरीस मा.कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधीकरण, सांगली यांचेकडन दि.29/05/2023 रोजी मान्यता मिळालेली असून मा.प्रधान सचिवसो, नगरविकास विभाग, मुंबई यांचेकडे प्रशासकीय मंजुरी मिळणेकामी जावक क्र.728 दि.30/06/2023 ने प्रस्ताव पाठविणेत आलेले आहे. या कामाच्या प्रशासकीय मान्यता, निविदा प्रसिध्द करणे, निविदा मागविणे, निविदा मंजूर करणे कामास कालावधी लागणार आहे.

स्थायी निदेश क्रं.36 परिशिष्ट -ब नियम -23 अनुसार मुळ कायदेशीर कालावधीनंतर सहा महिनेपेक्षा जास्त नाही अशा कालावधीपर्यंत चालू कामास मुदतवाढ देता येईल.यास्तव करारपत्र अट क्रं.11 अनुसार व महाराष्ट्र नगरपरिषद अधिनियम कलम 93- ब अनुसार अनुज्ञेय आहे. तरी घनकचरा व्यवस्थापन भूमी येथे घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत कच-यावर प्रक्रिया करणे व त्याची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट करणे, घनकच-यापासून Manual कंपोस्ट तयार करणे, घनकच-याचे शास्त्रोक्त पध्दतीने भूभरण करणे कामास पुढील निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत किंवा सहा महिने यापैकी जी प्रक्रिया आगोदर होईल तोपर्यंत मुदतवाढ देणेत येत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा